# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.02.2026** **वार:शनिवार**

1. गेल्या दशकात उभारलेले पायाभूत प्रकल्प, देशाच्या विकासाचा पाया ठरतील-पंतप्रधानांचा विश्वास
2. राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गांच्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी सरकार लवकरच धोरण जाहीर करणार
3. चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचं नाशिकमध्ये मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि
4. मराठी भाषा गौरव दिन राज्यभरात विविध उपक्रमांनी साजरा

**मोदी-वेबिनार**

गेल्या दशकभरात केंद्र सरकारने पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलं असून महामार्ग, रेल्वे, बंदरे यासारखे प्रकल्प भारताच्या विकासाचा पाया ठरतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. 'विकसित भारतासाठी तंत्रज्ञान, सुधारणा आणि निधीची तरतूद', या विषयावरील अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला त्यांनी दूरस्थ माध्यमातून संबोधित केलं. व्यवसायात सुलभता आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं केंद्र सरकार प्रशासनाचा विस्तार करत आहे, त्यामुळेच देश वेगाने प्रगती करत असल्याचं मोदी म्हणाले. देशातल्या विविध उद्योगांनी नवोन्मेषाच्या संकल्पनामध्ये गुंतवणुकीसाठी पुढे यावं, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. केंद्रीय अर्थसंकल्प म्हणजे केवळ अल्पकालीन अंदाजपत्रक नसून, तो विकासाचा धोरणात्मक आराखडा आहे, असं ते म्हणाले....

**ये देश Reform Express पर सवार है। इस Momentum को बनाए रखने के लिए हमें ना केवल पालिसी इंटेंट पर ध्यान देना है, बल्कि डिलीवरी एक्सीलेंस पर भी फोकस करना है। हमें AI, Blockchain और डेटा Analytics का व्यापक उपयोग कर Transparency, Speed और Accountability बढ़ानी ही होगी।**

**विधीमंडळ-मुंबई**

राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गातल्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी सरकार लवकरच धोरण जाहीर करणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी काल विधानसभेत केली. राज्यातल्या शाळांची परिस्थिती, शिक्षणाचा अधिकार आणि संबंधित विषयावर सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर ते उत्तर देत होते. येत्या शैक्षणिक वर्षात मराठी शाळांमधली पटसंख्या किमान 25 टक्के वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य शासन मराठी माध्यमाच्या शाळांकडे विशेष लक्ष देऊन सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देत आहे, याखेरीज इतर अनेक उपक्रमही राबवले जात आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

राज्यातल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुविधा वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन त्यांनी दिलं. राज्यातल्या सर्व माध्यमाच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी शिकवणं बंधनकारक असून एखाद्या शाळेत याची अंमलबजावणी होत नसली तर सरकार त्यावर कारवाई करेल असं आश्वासन त्यांनी दिलं. राज्यात कोणत्याही मराठी माध्यमाच्या शाळा बंद केल्या जाणार नाहीत अशी ग्वाही दादा भुसे यांनी आपल्या विभागातील पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला उत्तर देताना दिली. यानंतर दोन्ही विभागाच्या पुरवणी मागण्यांसह इतर विभागाच्याही मागण्या सभागृहात मंजूर करण्यात आल्या, त्यानंतर विनियोजन विधेयक ही मंजूर करण्यात आलं.

प्लॅस्टिक फुलांवर बंदी आधीपासूनच असली तरी त्याची कडक अंमलबजावणी करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितलं. प्लॅस्टिक फुलांचं उत्पादन, विक्री यावर बंदी घालण्यात येणार असून प्लॅस्टिक फुलांचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी काल विधान परिषदेत सादर केलं. नव्या सुधारणांनुसार, कोणत्याही सदस्याला अध्यक्ष तसंच परिषद सदस्य म्हणून निवडून आल्यास, एकाच वेळी दोन्ही पदं धारण करता येतील, मात्र केवळ एकच मत देता येईल. तथापि समसमान मते पडल्यास अध्यक्ष म्हणून निर्णायक मत देता येईल. नगरपंचायतीलाही हाच नियम लागू होईल.

**<u>मुख्यमंत्री- नाशिक</u>**

नवी मुंबईत आजपासून हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या 350 व्या हुतात्मा वर्षानिमित्त कार्यक्रम सुरू होणार आहे. या कार्यक्रमासाठी नाशिक जिल्ह्यातून जाणाऱ्या भाविकांच्या बसला आणि चित्ररथाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल हिरवा झेंडा दाखवून ओझर इथून मार्गस्थ केलं. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होत्या.

**<u>राष्ट्रीय विज्ञान दिन</u>**

नोबेल पुरस्कार विजेते ज्येष्ठ शास्त्रज्ञ सी वी रामन यांनी, रामन इफेक्ट हा महत्त्वपूर्ण शोध लावला, त्या घटनेचं स्मरण म्हणून आजचा दिवस देशभरात राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त पुण्यातील आयुका, आयसर, जीएमआरटी आणि पुणे वेधशाळा यांसारख्या नामवंत संस्थांमध्ये आज प्रदर्शनं, शास्त्रज्ञांशी संवाद आणि विविध वैज्ञानिक प्रयोगांचं आयोजन करण्यात आले आहे. आयुकातील अद्ययावत संशोधन सुविधा पाहण्याची संधी दिवसभर मिळणार आहे. राष्ट्रीय रेडिओ खगोलभौतिकी केंद्र अर्थात एनसीआरए नं आज आणि उद्या नारायणगाव तालुक्यातल्या खोडद इथं विज्ञान प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. या वेळी विविध वैज्ञानिक प्रयोग, लघुपट दाखण्यात येणार अशी माहिती 'एनसीआरए'चे प्रशासकीय अधिकारी ए. बी. जोंधळे यांनी दिली.

**<u>मराठी भाषा गौरव दिन-नाशिक</u>**

कविवर्य कुसुमाग्रज अर्थात विष्णु वामन शिरवाडकर यांचा जन्मदिन काल मराठी भाषा गौरव दिन म्हणून अत्यंत उत्साहात विविध लक्षवेधी उपक्रमांनी साजरा झाला. यानिमित्त काल मुंबईत विधानभवनात 'जावे विनोदाच्या गावा' हा विशेष कार्यक्रम झाला. आपल्या अभिजात मराठी भाषेला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध अशी मराठी भाषा आपण पुढील पिढीपर्यंत नेऊया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

मराठी भाषा दिनाचं औचित्य साधून चौथ्या विश्व मराठी संमेलनाचं उद्घाटन नाशिकमधल्या कुसुमाग्रज नगरीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. सध्या भाषांसमोर अनेक प्रकारची आव्हानं उभी आहेत. कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करून साहित्य निर्मिती झाली, तरी नवे अभिजात विचार, सृजनशील विचार कृत्रिम बुध्दीमत्ता देऊ शकणार नाही. त्यामुळे या काळात देखील अभिजात मराठी टिकूनच राहील असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. आपल्या उद्घाटनपर भाषणात मुख्यमंत्री म्हणाले......

**मराठी अभिजात भाषा तर आहेच पण ती आपल्याला सर्वदूर कशी नेता येईल, मराठी भाषेच्या माध्यमातनं कशा पद्धतीनं आपल्याला आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा उपयोग करून हे जे साहित्य आहे हे जना-जनापर्यंत कसं पोहचवता येईल याचा प्रयत्न हा आम्ही पुढच्या काळामध्ये करणार आहोत. आता आम्ही हा निर्णय केला आहे की आम्ही, आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करून एक त्या ठिकाणी भाषा शिकण्याकरता एक आम्ही लॅब तयार करणार आहोत. जी प्रत्येक शाळेमध्ये हळूहळू आम्ही देऊ त्याचे प्रयोग आम्ही करतो आहोत. आणि ह्या लँग्वेज लॅब मध्ये किमान त्या मुलांना त्या ठिकाणी तो जो काही एजंट आहे, त्या एजंट शी संवाद साधता येईल.**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात मराठी भाषा ही ज्ञानभाषा, संशोधनाची आणि चरितार्थाची भाषा झाली पाहिजे, असं मत व्यक्त केलं. उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी लंडनमध्ये मराठीचं वैश्विक केंद्र उभं राहत असल्याचं सांगितलं. यशवंतराव चव्हाण यांच्या नावानं साहित्याची अनुवाद समिती स्थापन करणार असल्याची घोषणा त्यांनी प्रास्ताविकात केली.

या सोहळ्यात डॉ. भालचंद्र नेमाडे यांना साहित्य भूषण, श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना विंदा करंदीकर जीवनगौरव, तर शांतिब्रह्म, गुरूवर्य मारुतीबाबा कुरेकर यांना विश्व मराठी संमलेनाच्या विशेष पुरस्कारानं गौरविण्यात आलं. संत निवृत्तीनाथ महाराजांच्या साहित्यासाठी नाशिकच्या संत निवृत्तीनाथ महाराज संजीवन समाधी ट्रस्टला 50 लाख रूपयांच्या मदतीचा धनादेश यावेळी देण्यात आला.

**<u>मराठी भाषा-सोलापूर</u>**

संपूर्ण राज्यात मराठी भाषा गौरव दिन काल अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात ज्येष्ठ लेखक सीताराम सामंत यांचा सत्कार करण्यात आला, तसंच छत्रपती शंभुराजे साहित्य पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं.

**<u>मराठी भाषा-सांगली</u>**

सांगलीत अभिजात मराठी साहित्य ग्रंथ प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>मराठी भाषा-नांदेड</u>**

नांदेड महापालिकेत महापौर कविता मुळे यांच्या उपस्थितीत मराठी भाषा प्रतिज्ञेचं सामूहिक वाचन करण्यात आलं.

**<u>मराठी भाषा-धाराशिव</u>**

धाराशिवमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते जिल्हा ग्रंथालयात कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ग्रंथ प्रदर्शनाचं आणि परिसंवादाचं उद्घाटन करण्यात आलं.

**<u>मराठी भाषा</u>**

मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या वतीनं दरवर्षी दिला जाणारा 'अ. का. प्रियोळकर ज्येष्ठ संशोधक पुरस्कार' गिरीश प्रभुणे यांना प्रदान करण्यात आला. मराठी भाषा आणि साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ संशोधकाला हा पुरस्कार देण्यात येतो. मराठीच्या बोली लोक परंपरेतील ज्ञानानं समृद्ध असून, या पारंपारिक ज्ञानाला विज्ञानाचा आधार आहे, आपण याकडं दुर्लक्ष केल्यामुळं हे ज्ञान उपेक्षित राहिलं  असल्याचं प्रभुणे यावेळी म्हणाले. मराठीच्या उच्च शिक्षणात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी गौरवण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज असून विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार